सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.
Email :-roamravati@dtemaharashtra.gov.in Web :- www.jdroamt.org
Phone :- 0721- 257 3027, 2572577 Fax :- 0721- 257 7913

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्रमांक.:- विकाअ/शिक्षण/२०२५/ 2254
दिनांक :- 14 AUG 2025

प्रति,

**प्राचार्य,**
सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित/खाजगी विना-अनुदानित
पदविका/पदवी/पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या विद्यमान संस्था,
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- १४ ऑगस्ट हा दिवस " फाळणी दु:खद स्मृती दिन " साजरा करणेबाबत.**
**संदर्भ:-** सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय,क्र. सीईआर-२०२५/प्र.क्र.२७३/राशि-१, दि.१३/०८/२०२५

उपरोक्त संदर्भांकीत विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, १४ ऑगस्ट हा दिवस "फाळणी दु:खद स्मृती दिन" संस्थानी आपल्या स्तरावर साजरा करावा. हा दिवस साजरा करतांना सोबत जोडलेल्या शासन निर्णयाप्रमाणे अवलोकन करुन कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाही अहवाल या कार्यालयास सादर करावा.

सहपत्र:- वरिलप्रमाणे

**प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,**
अमरावती.

**प्रत :-** प्रोग्रामर, तंत्राशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना ई-मेल व संकेतस्थळावर टाकण्याकरीता.

दिनांक १४ ऑगस्ट, २०२५ हा दिवस “फाळणी दुःखद स्मृती दिन" (Partition Horrors Remembrance Day) साजरा करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**शासन परिपत्रक क्र. सीईआर-२०२५/प्र.क्र.२७३/राशि-१**
मंत्रालय, मुंबई. ४०० ०३२.
दिनांक:- १३ ऑगस्ट, २०२५.

## परिपत्रक

केंद्र शासनाकडील संस्कृती मंत्रालय या विभागामार्फत दिनांक ७ ऑगस्ट, २०२५ रोजीच्या अर्ध शासकीय पत्रान्वये असे कळविण्यात आले आहे की, भारत सरकार दरवर्षी दिनांक १४ ऑगस्ट रोजी सन १९४७ मध्ये भारताच्या फाळणीदरम्यान लाखो लोकांनी अनुभवलेल्या दुःख, आघात व विस्थापनाचे स्मरण करण्यासाठी "फाळणी दुःखद स्मृती दिन" म्हणून साजरा करण्यात येतो. हा पवित्र उत्सव फाळणीच्या प्रचंड मानवी नुकसानाची आठवण करून देतो आणि शांतता, एकता आणि सलोखा या मूल्यांना प्रोत्साहन देण्याचा उद्देश ठेवतो. संस्कृती मंत्रालय देशभरात अर्थपूर्ण आणि सहभागी उपक्रमांद्वारे हा दिवस साजरा करत आहे.

भारत सरकारने गेल्या तीन वर्षीत राष्ट्रीय चर्चासत्रे, प्रदर्शन, चित्रपटांचे प्रदर्शन, मूक मोर्चा आणि वाचलेल्यांच्या संवाद सत्रांसारख्या अनेक कार्यक्रमांमध्ये उत्साही सार्वजनिक सहभाग दिसून आला आहे.

२. यानुषंगाने भारत सरकारने दि. १४ ऑगस्ट २०२५ रोजी देशभरात अनेक स्मरणार्थ उपक्रम राबवून “फाळणी दुःखद स्मृती दिन २०२५" साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे.

३. भारत सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयाने फाळणीमुळे झालेल्या लोकांच्या दुःखाचे प्रदर्शन, एक प्रदर्शन तयार केले आहे. हे प्रदर्शन https://rememberingpartition.org/ (डाउनलोड मेनू) या वेबसाइटवरून डिजिटल स्वरूपात (इंग्रजी आणि हिंदी दोन्हींमध्ये) डाउनलोड करण्यासाठी उपलब्ध आहे. या उपक्रमाचा प्राथमिक उद्देश जनतेमध्ये, विशेषतः तरुण पिढी आणि विद्यार्थ्यांमध्ये, फाळणीमुळे झालेल्या दुःखद वास्तवांबद्दल आणि मानवी दुःखाबद्दल जागरूकता निर्माण करणे आहे.

४. यासंदर्भात राज्य सरकारला दि.१४ ऑगस्ट २०२५ रोजी फाळणी दुःखद स्मृती दिनानिमित्त हे प्रदर्शन प्रदर्शित करण्याची विनंती करण्यात आली आहे.

५. यानुषंगाने सर्व विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांना विनंती करण्यात येते की, सदरचा स्मृती दिवस विभागीय स्तरावर / जिल्हा स्तरावर साजरा करण्यात यावे. परिच्छेद 3 मध्ये नमूद माहितीचा उपयोग करुन "फाळणी स्मृती दिना" वर आधारित प्रदर्शन महत्वाच्या अशा ठिकाणी ज्याठिकाणी मोठ्या संख्येने लोक सदर प्रदर्शन पाहू शकतील अशा ठिकाणी लावण्यात यावे. सदर प्रदर्शन हे गांभीर्यतापूर्वक व संयमाने प्रदर्शित करावे. विशेषतः समाजातील एखाद्या घटकाच्या/गटाच्या भावना दुखावल्या जाणार नाहीत याची विशेषत्वाने काळजी घ्यावी. प्रत्येक जिल्हयाच्या मुख्यालयात

६. उक्त प्रदर्शनाच्या कार्यक्रमाकरिता आदर्श कार्यप्रणाली (Standard Operating Procedure- SOP) निश्चित केली असून त्याची इंग्रजी भाषेतील सूची व परिपत्रक सोबत जोडण्यात आले आहे. त्याची थोडक्यात खालीलप्रमाणे आहे:-

प्रदर्शनाकरिता महत्वाच्या सूचना:-

१) सदर प्रदर्शन महत्वाच्या सार्वजनिक ठिकाणी उदा. Banks, Post Offices, Railway stations (रेल्वे स्थानके), Airports (विमानतळ), Shopping Mall, Educational Institutes (शैक्षणिक संस्था), Petrol Pump, Skill Development Center (कौशल्य विकास केंद्र) / Vocational Training Institute (व्यावसायिक प्रशिक्षण संस्था) इत्यादी ठिकाणी भरवण्यात यावे.

२) जास्तीत जास्त प्रसिध्दी, दर्शनीयता आणि प्रवर्धन याकरिता अधिकाधिक प्रयत्न करावेत.

३) प्रदर्शन, Digital Media याद्वारे देखील शाळा आणि शैक्षणिक संस्थांमध्ये करता येऊ शकेल.

४) कार्यक्रमामध्ये स्वातंत्र्यसैनिक, महत्वाचे वरिष्ठ नागरिक, जन प्रतिनिधी यांच्या हस्ते प्रदर्शनाचे उद्घाटन करण्याबाबत विनंती करावी.

५) उद्घाटनाच्यावेळी राष्ट्रभक्तीपर गीते लावावी. प्रसार माध्यमांना कळविण्यात यावे. फाळणीने बाधित झालेल्या व्यक्तींना प्रदर्शनात बोलाविण्यात यावे. कार्यक्रमाचा समारोप राष्ट्रगीताने करण्यात यावा. प्रदर्शनाच्या ठिकाणी आवश्यकतेनुसार सुरक्षा व्यवस्था करावी.

६) सदर प्रदर्शन गांभीर्य व संयमाने आयोजित करावयाचे आहे. अन्य कोणत्याही समुदायाच्या/समाज घटकाच्या अन्य कोणत्याही समुदायाच्या भावनांना न दुखावता फाळणीची शोकांतिका आणि जनसामान्यांचे दु:ख प्रकट करण्याच्या दृष्टीने हे परिपत्रक आहे ही बाब लक्षात घ्यावी. तसेच सदरचा कार्यक्रम संपूर्ण राज्यात पाळणे आवश्यक आहे.

वरील सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे व हे प्रदर्शन यशस्वीरित्या राबवावे.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०२५०८१३१५५५४६७३०७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

SUNIL SURESH SONAR

Digitally signed by SUNIL SURESH SONAR
DN: CN = SUNIL SURESH SONAR, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT
Date: 2025.08.13 15:56:51 +05'30'

**(सुनील सोनार),**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. मुख्य सचिव,

२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव

३. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई.

४. सर्व विभागीय आयुक्त

PARTITION HORRORS REMEBERENCE DAY
14 AUGUST

<u>Important Instructions for the Exhibition</u>

. This exhibition should be displayed at the important public places like banks, post offices, Govt buildings, educational institutions, community halls, petrol pumps, shopping malls etc. Enough efforts should be made so that that maximum people can see the exhibition

. This exhibition can be printed on sun-board and be placed on easels
The size can be 2.5' x 4'

. This exhibition can also be shown through digital media

. There can be a brief function at the beginning of the exhibition

. Freedom Fighters, prominent senior citizens or public representatives be requested to inaugurate this exhibition

. Patriotic songs be played during the inaugural ceremony

. In the beginning there can be a brief introduction about the purpose of the exhibition

. Media be invited to the exhibition

. Persons who have suffered the tragedy of partition should be invited to the exhibition

0. The inaugural ceremony should end with the National Anthem

1. Exhibition should be displayed for a definite duration

2. Enough arrangements be made for security of the exhibition

3. Enough efforts be made so that more and more people can come and see the exhibition